# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

दिनांक 15/06/2021 (मंगळवार)

(सायंकाळ)

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. कन्हान :– फिर्यादी नामे– दिपक हरिभाउ पोटभरे, वय 53 वर्ष, रा. कांद्री वार्ड नं 05 यांचे आरोपी नामे– 1) देवेन्द पोटभरे 2) नरेन्द्र पोटभरे 3) सुरेन्द्र पोटभरे 4) रामकृष्ण पोटभरे 5) सौ.इंद्रावती पोटभरे सर्व रा. कांद्री वार्ड नं. 05 कन्हान यांचे सोबत जमीनीचा मालकी हक्काबाबत जुना वाद सुरू होता. दिनांक 14/06/2021 चे 18.00 वा. ते 18.30 वा. दरम्यान कांद्री वार्ड न. 05 कन्हान येथे फिर्यादी आपल्या मुलासोबत आंबे घेण्याकरिता कांद्री बस स्टाफ येथे गेले होते. त्यादरम्यान आरोपी क 1 व 2 हे तिथे गेले व आरोपी क 1 याने फिर्यादीस म्हटले की, ''तुम्ही दोघे नवरा बायको आमच्याकडे घुरावून पाहत जावु नका'' असे म्हटले असता आरोपी क 1 याने त्याचा जवळ असलेल्या लोखंडी हातोडी ने फिर्यादीचा डोक्यावर जिवानिशी ठार मारण्याचा उददेशाने 5 ते 6 वेळा मारून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून ''तुला आता जानसे मारून टाकतो'' असे म्हटले. यानंतर आरोपी क. 2 याने आरोपी क 1 चा हातुन तिच हातोळी घेवुन फिर्यादीस मारहाण केली सदर घटनास्थ्ळी लगेच 3,4 व 5 हे येवुन आरोपी क 3 याने फिर्यादीचा हातावर व पायावर लोखंडी पायपाने मारहाण केली व फिर्यादीचा भाउ प्रकाश पोटभरे हा त्यास सोडविण्याकरिता आला असता त्यास सुध्दा आरोपी क. 3 याने पाठीवर व हातावर मारहाण केली व आरोपी क 4 व 5 यांनी ''नेहमीचीच किटकिट आहे आज तुम्हाला खतमच करायचे आहे'' अशी धमकी देत आरोपी क 5 हिने फिर्यादीचा गालावर हातबुक्कीने मारहाण केली. अशा प्रकारे आरोपीतांनी बेकायदेशीर जमावाची मंडळी जमवुन फिर्यादीस जिव घेण्याचा उददेशाने लोखंडी हातोळी व लोखंडी पाईपानी मारून गंभीर जखमी केले आहे.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 307,324,323,143,147,148,149,294,506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. मेश्राम मो.क्र. 9067176694 हे करीत आहे.

### विश्वासघात

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 15 कि. मी. अंतरावर मौजा बाजारगाव भारत पेट्रोलपंप जवळ येथे दिनांक 12/06/2021 चे रात्री 12.30 वा. ते सकाळी 07.00 वा. दरम्यान आरोपी नामे– अशोक जितूलाल नागो़त्रा, वय 48 वर्ष, रा. रामु गिरी नायडूबाई स्कुल प्लॉट नं 21 शेंन्डे नगर कामठी याने फिर्यादी नामे– राजेंद्र रामभगतसिंग चौहाण वय 44 वर्ष रा. नेताजी नगर प्रथमेश किराणा स्टोअर्स नागपूर जि.नागपुर याचे एमएच– 04/ जीआर– 2774 क्रमांकाच्या 10 चक्का ट्रकमध्ये भरलेल्या 1700 सोयबीन रिफाईन ऑईल तेलाचे बॉक्स पैकी 160 बॉक्सची कि अंदाजे 3,68,000/–रू. चा माल अफरातफरीने करून फिर्यादीचा विश्वासघात केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 406 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा भोजराज तांदुळकर मो.नं .9922314442 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यू

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 01 फर्लांग अंतरावर कोंढाळी लगत नागपूर अमरावती हायवे रोड चे सर्व्हिस रोडवर येथे दिनांक 14/06/2021 चे 20.30 वा. ते दिनांक 15/06/2021 चे 07.00 वा. दरम्यान मृतक नामे– अशोक जितूलाल नागोत्रा, वय 48 वर्ष, रा. शेन्डे नगर, कामठी जि. नागपूर यांचे विरूध्द पो.स्टे. कोंढाळी येथे दिनांक 14/06/2021 रोजी अप क्र 173/21 कलम 406 भादवी चा गुन्हा नोंद आहे. मृतक हयाने पो.स्टे. कोंढाळीचे बाजुला नागपूर अमरावती हायवे रोडचे सर्व्हिस रोडवर उभा असलेला त्याचा एमएच 04/जिआर– 2774 कमांकाच्या ट्रकचे ड्रायव्हर साईडचे दरवाजाचे वरिल हुकाला ताराचे साहयाने गळफास घेवुन आत्महत्या केली.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक मंगेश धारपुरे पो. स्टे. कोंढाळी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास श्री अशोक सरंबळकर उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर